Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ३५ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.२२ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.



# आदिवासी बांधवांचा आक्रोश मोर्चा धडकला थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर

**गडचिरोली । प्रतिनिधी**

खऱ्या आदिवासींच्या आरक्षण सूचीमध्ये गैरआदिवासी धनगर समाजाचा समावेश करू नये या मागणीसाठी जिल्ह्यातील २५ आदिवासी संघटनांच्या नेतृत्वात हजारो आदिवासी बांधवांचा महाआक्रोश मोर्चा शुक्रवार, २० ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला.गडचिरोली शहराच्या धानोरा मार्गावरील शिवाजी महाविद्यालयातून आदिवासींच्या मोर्चाची सुरुवात झाली. मोर्चात जिल्हाभरातील विविध भागातून आदिवासी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'आरक्षण आमच्या हक्काचे . आदिवासी बचाओ, संविधान बचाओ, जय सेवा, भारत माता की जय' यासह विविध घोषणा मोर्चेकरूंनी दिल्या. विविध घोषणांनी शहरासह जिल्हाधिकारी कार्यालय परिसर गजबजून गेला असल्याचे प्रत्यक्षदर्शी दिसुन



येत होते.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या मार्गावर मोर्चेकरूंसाठी बसण्याची व्यवस्था केली होती. जिल्हाधिकारी कार्यालय, जि.प., जिल्हा व सत्र न्यायालय परिसरातील विविध रस्ते पोलिसांनी बंद केले होते. कसलाही अनुचीत प्रकार घडू नये याकरिता पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. रहदारी सुरळीत ठेवण्यासाठी केवळ नवेगाव टी-पॉइंट ते सोनापूर रस्ता सुरू ठेवला होता.आंदोलनात आमदार डॉ. देवराव होळी, माजी आमदार डॉ. नामदेव उसेंडी, आनंदराव गेडाम, तसेच काँग्रेसचे नामदेव किरसान, विश्वजीत कोवासे, विकास कोडापे, नंदू नरोटे, डॉ. नितिन कोडवते, छगन शेडमाके, माधव गावळ, भरत येरमे, कुणाल कोवे, सैनू गोटा, सदानंद ताराम, दौलत धुर्वे, गंगाधर मडावी आदींसह विविध संघटनांचे पदाधिकारी व सदस्य व आदिवासीबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात विविध घोषणा दिल्यानंतर संयोजक समितीच्या वतीने समितीचे अध्यक्ष घनश्याम मडावी यांच्या नेतृत्वात विविध २६ मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. यावेळी समितीचे सचिव भरत येरमे, कार्याध्यक्ष माधवराव गावळ, उपाध्यक्ष प्रशांत मडावी, सहसचिव गुलाबराव मडावी, कोषाध्यक्ष नामदेव उसेंडी, चंद्रकुमार उसेंडी तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

## कंत्राटी पदभरतीचा जीआर काढणाऱ्या महाविकास आघाडीचा भाजपकडून निषेध

### त्यांच्या पापाचे ओझे आम्ही उचलणार नाही- खा.अशोक नेते

**गडचिरोली । प्रतिनिधी**

तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने काढलेला कंत्राटी पदभरतीचा जीआर विद्यमान महायुती सरकारने रद्द केल्यानंतर शनिवारी भाजपच्या वतीने इंदिरा गांधी चौकात निदर्शने करून महाविकास आघाडीचा निषेध केला. शरद पवारांच्या आशीर्वादाने आणि उद्धव ठाकरेंच्या स्वाक्षरीने झालेल्या कंत्राटी भरतीच्या पापाचे ओझे आम्ही उचलणार नाही. स्वत: सारे करुन आमच्याविरुद्ध आंदोलन करताना यांना लाज वाटली पाहिजे, युवकांची माथी भडकावून महाराष्ट्र अशांत करण्याचा प्रयत्न करणार्यांना यानंतर सुद्धा उघडे पाडणार, असा ईशारा यावेळी खासदार अशोक नेते यांनी दिला.

यावेळी जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे यांच्यासह किसान आघाडीचे प्रदेश सचिव रमेश भुरसे,



ओबीसी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष बाबुराव कोहळे, लोकसभा समन्वयक प्रमोद पिपरे, जिल्हा महामंत्री योगिता पिपरे, जिल्हा उपाध्यक्ष भारत खटी, ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष अनिल पोहनकर, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष गिता हिंगे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अनिल तिडके, शहराध्यक्ष मुक्तेश्वर काटवे, तालुकाध्यक्ष विलास भांडेकर, वर्षा शेडमाके, पल्लवी बारापात्रे, कविता उरकुडे, सुधाकर पेटकर, मधुकर भांडेकर, बंडू झाडे, दीपक सातपुते, विवेक बैस, विनोद देवोजवार, रविंद्र भोयर, डंबाजी झरकर, गणेश दहेलकर, हर्षल गेडाम, आशिष रोहणकर, तसेच भाजपचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## आशियाई क्रीडा स्पर्धेत राज्यातील पदक विजेत्या खेळाडू, मार्गदर्शकांच्या पारितोषिक रक्कमेत दहापट वाढ – क्रीडा मंत्री बनसोडे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे नाव उज्वल केलेल्या राज्यातील खेळाडूंना व त्यांच्या मार्गदर्शकांना प्रोत्साहन पर बक्षीस देऊन त्यांचा गौरव करण्यासाठी आशियाई क्रीडा स्पर्धेतील(एशियन गेम्स) पदक विजेत्या खेळाडू आणि मार्गदर्शकांना देण्यात येणाऱ्या पारितोषिक रक्कमेत दहापट वाढ करण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.



मंत्री बनसोडे म्हणाले, १९ व्या चीन येथील हँगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या खेळाडूस १ कोटी रूपये,मार्गदर्शकास १० लक्ष, रौप्यपदका विजत्या खेळाडूसाठी ७५ लक्ष रूपये,मार्गदर्शकास ७ लक्ष ५० हजार रुपये, कांस्यपदक प्राप्त खेळाडूस ५० लक्ष रुपये ,मार्गदर्शकास ५ लक्ष रुपये रोख असे बक्षिस देण्याचा महत्त्वपुर्ण निर्णय सरकारने घेतला आहे. तसेच स्पर्धेत भाग घेणाऱ्या सहभागी खेळाडूंना प्रोत्साहनपर १० लाख रुपये देण्यात येणार असल्याचे राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले.तसेच आशियाई क्रीडा स्पर्धेतील(एशियन गेम्स)सांघिक क्रीडा प्रकारात सुवर्ण पदक प्राप्त खेळाडूस ७५ लक्ष,मार्गदर्शकास ७ लक्ष ५० हजार ,रौप्यपदक विजत्या खेळाडूस ५० लक्ष,मार्गदर्शकास ५लक्ष तर कास्य पदक विजेत्यास २५ लक्ष ,मार्गदर्शकास २ लक्ष ५० हजार देण्यात येणार असून याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला असल्याचे ना . बनसोडे यांनी सांगितले.यापुर्वी सुवर्णपदकासाठी १० लाख मार्गदर्शकास २ लक्ष ५० हजार, रौप्यपदकासाठी ७.५ लाख,मार्गदर्शकास १ लक्ष ८७ हजार , कांस्यपदकासाठी ५ लाख,मार्गदर्शक १लक्ष २५ हजार रुपये दिले जात होते. मात्र आता आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी करुन जागतिक स्तरावर पदकांचा इतिहास रचला. त्यात महाराष्ट्राच्या खेळडूंचे मोठे योगदान आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रोख रकमेत वाढ करण्याचा निर्णय घेतला असे ना . बनसोडे यांनी स्पष्ट केले.उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आठ दिवसापुर्वी क्रीडा व युवक कल्याण विभागाची आढावा घेतला होता. त्या बैठकीत पंजाब, हरियाणा ,मध्यप्रदेश राज्याप्रमाणे आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूंच्या रकमेत वाढ करण्यावर चर्चा करण्यात आली होती, त्याप्रमाणे निर्णय घेण्यात आला असल्याचे मंत्री बनसोडे यांनी यावेळी सांगितले.

## अहेरीचा सुपुत्र बनला पशुधन विकास अधिकारी

### जिद्द आणि चिकाटीमुळे डॉ.चेतन अलोनेला यश

**गडचिरोली । प्रतिनिधी**

सरकारी अधिकारी होण्याचा स्वप्न उराशी बाळगून एमपीएससी परीक्षेसाठी विद्यार्थी अनेक वर्ष मेहनत घेतात. यात अनेकांना अपयश पदरी पडतं तर काहींना यश मिळतं. मात्र, जिद्द आणि चिकाटी असेल तर कोणीही आपल्याला आपल्या ध्येयापासून रोखू शकत नाही. असंच काही आदिवासीबहुल आणि नक्षलग्रस्त भागातील एका तरुणाने देखील मेहनतीच्या जोरावर प्रामाणिक कष्ट केले आणि घवघवीत यश संपादन केले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी या घेण्यात आलेल्या २०२२ च्या मुख्य परीक्षेचा निकाल २० ऑक्टोबर २०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे.यात अहेरी येथील डॉ चेतन अलोने याला घवघवीत यश मिळालं आहे.तो पाचव्या रँक मध्ये उत्तीर्ण झाला आहे.

डॉ.चेतन शकुंतला देवाजी अलोने याचे प्राथमिक शिक्षण कै. मद्दीवार प्राथमिक शाळेतून तर माध्यमिक शिक्षण राजे धर्मराव कृषी विद्यालय अहेरी येथे पूर्ण झाले. वडील सरकारी नोकरीवर असल्यामुळे मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी पुढाकार घेतला. पुढे उच्च माध्यमिक शिक्षणासाठी चेतन अलोने यांनी चंद्रपूर गाठले.जनता विद्यालयातून त्यांनी अकरावी आणि बारावीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी नीट परीक्षेत चांगले गुण मिळवत नागपूर येथील पशुवैद्यकीय महाविद्यालय येथे प्रवेश मिळविला.२०१८ मध्ये बिव्हिएस्सी पदवी मिळवली आणि २०२० मध्ये त्यांनी एमव्हिएस्सी मास्टर पूर्ण केले. शिक्षण सुरू असतानाच त्यांना प्रख्यात अशा प्रीमियम



चिक फीड कंपनीकडून चांगल्या पॅकेजची ऑफर मिळाली आणि त्यांनी ते स्वीकारली.डॉ.चेतन अलोने सध्या पश्चिम बंगाल येथील वेंटेरिनरी क्षेत्रातील भारतातील प्रख्यात अशा प्रीमियम चिक फीड कंपनीत कार्यरत असून त्याला गलेलठ्ठ पॅकेज सुद्धा आहे. मात्र यात तो समाधानी नव्हता. सरकारी नोकरी मिळविणे हाच त्याचा उद्देश होता. त्याने खाजगी कंपनीत नोकरी करता-करता एमपीएससी परीक्षेची तयारी सुरू केली.२०२१ मध्ये देखील त्याने लेखी परीक्षा व मुलाखत दिली होती.

**सुरुवातीपासूनच आपण सरकारी नोकरी मिळवायची ही जिद्द होती. त्या अनुषंगाने विविध प्रयत्न सुरूच होते. मात्र,यश आले नाही.त्यामुळे एमपीएससी परीक्षेची तयारी केली अखेर त्यात यश मिळालं. अनेकांना अनेकदा अपयशाला समोर जावं लागतं.मात्र, खचून न जाता जिद्द आणि चिकाटीने परत-परत प्रयत्न केल्यास एक दिवस नक्कीच यश मिळणार आहे.**
**-डॉ.चेतन अलोने,अहेरी**

मात्र त्याला यश आले नाही. या दरम्यान त्यांच्या काही मित्रांनी सुद्धा त्याची साथ सोडली होती. आई-वडिलांचा आशीर्वाद आणि त्यांचा प्रोत्साहन यामुळे अखेर त्याला यश मिळाले.त्याने २२ डिसेंबर २०२२ मध्ये परीक्षा दिली.५ सप्टेंबर २०२३ रोजी मुलाखत झाली आणि त्याचा निकाल नुकतेच २० ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास जाहीर झाला.याची माहिती मिळताच अहेरीत आनंदाचे वातावरण पसरले.तर त्यांच्यावर सर्व स्तरावरून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. गडचिरोली सारख्या नक्षलग्रस्त भागात शिक्षण घेऊन एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश मिळवून चेतनने पशुधन विकास अधिकारी या पदाला गवसणी घातली आहे,ही अभिमानास्पद बाब आहे.

## कंत्राटी भरतीचा जी.आर. रद्द करणाऱ्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी मानले आभार

**गडचिरोली । प्रतिनिधी**

राज्यातील बहुतांश सरकारी कर्मचाऱ्यांचे पदे हे कंत्राटी पद्धतीने भरण्याचा महाविकास आघाडी सरकार असतांना तत्कालीन मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरेंनी घेतला होता ह्याला कांग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने समर्थन दिले होते, राज्यभर ह्या निर्णयाला प्रचंड विरोध झाल्यावर अखेर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पत्रकार परिषद घेऊन हा काळा जी आर . रद्द करण्याचा स्तुत्य निर्णय घेतला.ह्याबद्दल माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तथा महायुती सरकारचे अभिनंदन केले आहे, सरकारी कंत्राटी भरतीचा ऋठ रद्द करावा अशी मागणी माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम काही महिन्यांपूर्वीच एक पत्र देऊन देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती हे विशेषशिक्षकांच्या कंत्राटी भरतीवरून राज्यभरात गदारोळ झाल्यानंतर आता अखेर राज्य सरकारने एक पाऊल मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. कंत्राटी भरतीचा जी आर आम्ही रद्द करणार असल्याची घोषणा भाजपा नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.'आधीच्या सरकारांनी



केलेले पाप आपल्या माथी नको, अशी भूमिका मांडत मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा केली असून सरकारी कंत्राटी भरतीचा जी आर आम्ही रद्द करणार आहोत,' अशी माहिती फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत काल दिली होती ह्या निर्णयाने बेरोजगार युवकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# नवरात्रोत्सव

**सण आणि उत्सव हे मनाला आनंद देण्यासाठी असतात. कष्टमय जीवनात विरंगुळा देणारे काही क्षण आपल्याही वाट्याला यावेत असे प्रत्येकाला वाटते. तो आनंद घेण्या,देण्यासाठी सण उत्सवांच्या निमित्ताने आपणं सगळे पुढे येत विविध सण साजरे करत असतो. ते साजरे करणे आपले नैतिक कर्तव्ये आहे. हा वारसा आपणं सगळ्यांनी जपला पाहिजे. स्वत:सह इतरांनाही निर्मळ आनंद देण्यासाठी उत्सव साजरे केलेच पाहिजे. त्यापैकी एक सण म्हणजे नवरात्रोत्सव.**




मागील काही दिवसांपासून नवरात्रोत्सवाची धूमधाम सगळीकडे अगदी जोमात सुरू आहे. सर्वत्र दांडियाची गाणी, देवींचे महात्म्य वर्णन करणारी गाणी व संगीत, चौकाचौकांमध्ये स्थानापन्न असलेल्या देवींच्या मूर्ती, महिलांची समूह भजने, अध्यात्मिक कलाकौशल्य, विविध प्रकारचे धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल, महिलांच्या चाललेल्या बैठका,तेथे रंगलेल्या वैविध्यपूर्ण चर्चा, गप्पागोष्टी, गरबा, दांडिया अशा समूहनृत्यातून चाललेला सुप्त कलाविष्कार हे सर्व सुखद अनुभूती देणारे क्षण आहेत. व्यस्त दैनंदिन जीवनातून थोडासा वेळ काढून स्वतःच्या रंजन आणि मनोरंजनासाठी नवरात्रोत्सव मौलिक योगदान देतो. एकीकडे मानवाची भौतिक प्रगती झाली. माणूस चंद्रावर पोहचला. दुसरीकडे अनेकांमध्ये मानसिक टेन्शनचा वणवा चेताळताना दिसतोय. अनेकांकडे पैसा असूनही समाधान मानावे असे जीवन नाही. कधी कार्यालयातील तणाव ,कधी आर्थिक तणाव, कधी कौटुंबिक तणाव, कधी वैयक्तिक तणाव, कधी मानसिक तणाव, सांसारिक व मुलाबाळांच्या अशा एक ना अनेक प्रश्नांनी सार जग परेशान दिसतयं. असले सगळे प्रकार अनेकांच्या आयुष्यामध्ये वाट्याला येत असतात. या दृष्टचक्रात सापडलेल्यांना मानसिक आधार देण्याचे काम नवरात्रोत्सव करतो. नवरात्रोत्सव काळात दिवसभराच्या कामातून थकूनभागून आलेला माणूस जेवणखाण आटोपून फेरफटका मारत देवींचे दर्शन करून आल्यावर त्याच्या चेहऱ्यावर जे समाधान दिसते ते अतुलनीय आहे. जे आध्यात्मिक आणि मानसिक समाधान मिळते त्याची तुलना शब्दांमध्ये व्यक्त होऊ शकत. ते मोजण्यासाठी शब्दही अपुरे पडतात. शेवटी माणूस जगतो कशासाठी? सण उत्सव साजरे करतो कशासाठी? आंतरिक समाधानासाठीच ना! अशा सामूहिक सण उत्सवांच्या माध्यमातून त्यांना नक्कीच आंतरिक समाधान लाभत असते. काही लोक अध्यात्माचा विरोध करतात.बौध्दिक कसरती करीत आपले ज्ञान व्यक्त करतात.अध्यात्म माणसाला निष्क्रियता शिकवते, पैशाची उधळपट्टी,वेळेचा अपव्यय वगैरे वगैरे बरळतात.याबाबत मते मतांतरे असू शकतात. या देशात लोकशाही आहे. प्रत्येकाला आपली



स्वतःची मते व्यक्त करण्याचा अधिकार आहे. त्यांनी ती केली तर त्याबद्दल वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. प्रत्येकांनी व्यक्त झालेही पाहिजे. शेवटी काय ऐकायचे आणि काय सोडून द्यायचे आपला ज्याचा त्याचा प्रश्न असतो. त्याबद्दल प्रतिक्रिया द्यायची गरज वाटत नाही. पण हेही सत्य आहे की,जीवनाला निर्मळ आनंद देण्याचे काम जर कोणी करत असेल तर ते अध्यात्म. त्याचा फार बाऊ करू नये. प्रदर्शनाचीही गरज नाही. पण त्यातून मिळणाऱ्या आंतरिक समाधानाची तुलना कुठल्याच बाबीशी होऊ शकत नाही. आयुष्याच्या वार्धक्याच्या उत्तरार्धात अनेक नास्तिक लोक आस्तिकतेकडे वळलेले दिसतात. ज्या माणसाने आयुष्यभर नास्तिक नास्तिक म्हणून दिंडोरा पेटविला, पुरस्कार मिळविले अशी माणसे आयुष्याच्या अखेरीकडे असताना आस्तिकतेकडे का वळतात? त्याचेही उत्तर शोधण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.अध्यात्म हे मनाला शांती देणारे साधन आहे. या अध्यात्मातून माणूस शेवटी सुखाचा आणि आनंदाचा मार्ग शोधतो. त्यातूनच त्याच्यामध्ये उत्सवप्रियता आली असावी. त्यासाठी विविध उत्सव साजरे केले जातात . नवरात्रोत्सवात महिलांना त्यांच्यातील सुप्त कलागुण दाखविण्याची संधी मिळते. घराच्या चार भिंतीत राहून सुस्तावलेल्या मनाला स्फूर्ती मिळते.या निमित्ताने सुप्त कलागुणांना वाव मिळाल्याने व्यक्त करण्याची संधी मिळते. दांडिया,गरबासारख्या समूह नृत्यातून कौशल्ये बघायला मिळतात. दांडिया गरबा यासारख्या समूह नृत्यातून अध्यात्माचे प्रदर्शन होत असले तरी दुसरीकडे शारीरिक व्यायामाचाही तो प्रकार आहे. या खेळांच्या माध्यमातून विविध प्रकारच्या शारीरिक हालचाली होत असल्याने एक प्रकारचा शारीरिक व्यायाम लाभतो. एखाद्याला मुद्दामहून व्यायाम करायला सांगितले तर कदाचित तो करणार नाही. पण गरबा दांडियासारख्या समूह नृत्यात सामील झाल्यावर त्याच्यात वेगळेपणाची भावना राहत नाही. तो त्यात सामील होऊन मनमुरादपणे नाचतो. अलीकडे मोठ्या प्रमाणावर साजरे केले जाणारे सामूहिक सण आणि उत्सव हे कदाचित अध्यात्मासोबतच मानसिक शांती शोधण्याचा मार्ग सुकर तर करत नसतील. मात्र त्यात श्रध्दा असावी, प्रामाणिक भक्ती असावी, विकृती नसावी एवढेच.

# जातगणना आणि मतगणना

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी कोणते मुद्दे मतदारांसमोर घेऊन जायचे आणि त्यांना कौल लावायचा, याची तयारी वर्षभर तरी आधी सुरू होतेच. काँग्रेसने आता जातगणनेचा मुद्दा लावून धरला असला तरी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आपल्या राज्यातील जातगणनेचे आकडे जाहीर करून या विषयाला गती दिली होती. आता काँग्रेसने तर कार्यकारिणीत जातगणनेची औपचारिक मागणीच केली आहे. काँग्रेसची सत्ता असणाऱ्या राज्यांमध्ये जातगणना केली जाईल, असेही राहुल गांधी यांनी जाहीर केले आहे. 'इंडिया' या विरोधकांच्या आघाडीतील काही पक्षांकडेही काही राज्यांमधील सत्ता आहे. इतर विरोधी पक्षही ही कल्पना उचलून धरतील, ही राहुल गांधी यांची अपेक्षा चूक नाही. तशी अनौपचारिक चर्चा आधी झालीही असू शकते. भारतीय जनता पक्षाने काँग्रेस कार्यकारिणीच्या ठरावावर पहिली प्रतिक्रिया देताना इतकी वर्षे काँग्रेसच्या हातात देशाची सत्ता असताना जातगणना का केली नाही, असा सवाल केला आहे. तो योग्य आहे. मात्र, हे काँग्रेसच्या आजच्या रणनीतीला उत्तर होऊ शकत नाही. इंग्रजांनी देश पारतंत्र्यात असताना १९३१ मध्ये जातवार जनगणना केली होती. तेव्हा ती सारी आकडेवारी जाहीर करण्यात आली होती. पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी पहिले जनता सरकार असताना जानेवारी १९७९ मध्ये विविध जातींमधील सामाजिक, शैक्षणिक मागासलेपण शोधण्यासाठी मंडल आयोग नेमला होता. तेव्हाही सरकारने नव्याने जातगणना केलीच नाही. जुनाच सगळा तपशील वापरून मंडल आयोगाने



अहवाल दिला. तो पुढे १२ वर्षांनी बासनातून बाहेर काढण्यामागचा तेव्हाचे पंतप्रधान व्ही. पी. सिंह यांचा हेतूही कितपत पारदर्शक होता, याची शंकाच आहे. हा सगळा इतिहास नोंदवायचे कारण म्हणजे देशातील जातवास्तवाचा राजकीय वापर करण्याची रीत किती जुनी आहे ते लक्षात यावे. मंडल आयोगाचा अहवाल बाहेर आला नसता तर अयोध्येच्या आंदोलनात भाजप उतरलाही नसता. खुद्द लालकृष्ण अडवाणी यांनीही ही संगती मान्य केली होती. जातींना न्याय न देता नुसतेच राजकारण करण्याचा उद्योग पुढे कुठल्या दिशेने जाईल; हे काल सांगता येत नव्हते आणि आजही सांगता येत नाही. 'तुमच्यापैकी कोण कोण ओबीसी आहे' असा प्रश्न पत्रकारांना पत्रकार परिषदेत विचारणे सोपे आहे. त्यापेक्षा आत्मपरीक्षण करून आपण किंवा आपल्या पक्षाने ओबीसी किंवा अतिमागास समाजांसाठी नेमके काय केले, असा प्रश्नही विचारला गेला पाहिजे. काँग्रेसच्या सर्व मुख्यमंत्र्यांनी आता आपापल्या राज्यात जातगणना करण्यास मान्यता दिल्याचे राहुल गांधी यांनीच म्हटले आहे. आता भाजपलाही हा मुद्दा टाळून पुढे जाता येणार नाही. २०२१ मध्ये अपेक्षित असणारी जनगणना अनेकदा पुढे गेली. करोनाचे कारण संपले असले तरी ती आजही सुरू झालेली नाही. कार्यक्षम केंद्र सरकारच्या मनात या विषयी काय आहे, ते कळायला मार्ग नाही. आता जेव्हा जनगणना होईल, तेव्हा कमालीची काळजी घेऊन, नागरिकांकडची कागदपत्रे व पुरावे तपासून आणि सर्व अत्याधुनिक तंत्रवैज्ञानिक साधनांची मदत घेऊन अचूक जातगणना करण्यास दुसरा काही पर्याय आजतरी दिसत नाही. आज विविध समाज घटकांना देण्यात आलेला आरक्षणाचा वाटा योग्य आणि त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आहे किंवा नाही, हेही कळायला मार्ग नाही. १९३१ ची जातगणना योग्यच होती हे कशावरून आणि तेव्हापासून जवळपास शंभर वर्षांमध्ये समाजातील विविध जातींची टक्केवारी आणि प्रमाण तेवढेच राहिले असेल, असा समज करून घेणेही अशास्त्रीय आणि सत्यापासून पळ काढणारे आहे.मंडल आयोगाने ओबीसी म्हणजे इतर मागासवर्गियांचे लोकसंख्येतील प्रमाण ५२ टक्के असावे, असे म्हटले होते. त्यानंतर नॅशनल सँपल सर्व्हेने ही टक्केवारी ४२ असल्याचे म्हटले होते. हा फरक मोठा आहे. आज देशात ओबीसींच्या एकूण दोन हजार ६३३ जाती नोंदविल्या गेल्या आहेत. त्यांची सर्वच राज्यातील स्थिती सारखी नाही. तसेच, काही जाती विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या श्रेणीतही जाऊ शकतात. मोदी सरकारने ओबीसींमधल्या अंतर्गत आरक्षणात अतिमागास जातींवर अन्याय होऊ नये, यासाठी राष्ट्रपती कोविंद यांनी २०१७ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाच्या माजी मुख्य न्यायमूर्ती जी.रोहिणी यांचा आयोग नेमला होता. १४ वेळा मुदतवाढ मिळाल्यानंतर न्या. रोहिणी यांनी अलीकडेच हा अहवाल केंद्र सरकारला सादर केला आहे. आता सरकार हा अहवाल स्वीकारणार आहे की नाही, हे अजून समजलेले नाही. तो जाहीरही झालेला नाही. काँग्रेसच्या नव्या भूमिकेमुळे या अहवालालाही वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. देशातील सर्वच घटकांना मिळणारे आरक्षण आणि त्यांतील फेरबदल किंवा फेरआखणी हा खरेतर राष्ट्रीय महत्त्वाचा मुद्दा मानून सर्व राजकीय पक्षांनी तो निवडणुकीच्या राजकारणाच्या बाहेर ठेवायला हवा. मात्र, सगळ्यांच पक्षांना जातगणनेइतकीच किंवा त्याहूनही अधिक मतगणना महत्त्वाची वाटते. मात्र, यावरून देशात जे काही सौहार्द टिकून आहे; ते संपवू नका, इतके मात्र आग्रहाने सांगायला हवे.

## भारतीय जनता पार्टी महानगर चंद्रपूर द्वारे भव्य निदर्शने

# भारतीय जनता पार्टी सत्तेसाठी नव्हे तर युवकांच्या कल्याणाकरिता कार्य करते - राहूल पावडे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

कंत्राटी पदभरती करुन युवकांच्या मनात असंतोष निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र या भरतीला सुरुवात कॉंग्रेस-राष्ट्रवादीनेच केली होती. २००३ साली कॉंग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार असताना शिक्षण विभागात कंत्राटी भरती करण्यात आली. त्यानंतर २०१० साली अशोक चव्हाण मुख्यमंत्री असतांना दोनदा कंत्राटी भरती काढण्यात आली. २०११ साली पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना कंत्राटी भरतीचा जिआर काढण्यात आला. २०१३ साली ही अशीच भरती काढण्यात आली. उध्दव ठाकरे हे मुख्यमंत्री असताना शरद पवार यांच्या आशिर्वादाने त्यांनीही कंत्राटी पदभरतीची निविदा काढली होती. मात्र हे लोक स्वतःच पाप आम्हच्या माती फोडण्याचा प्रयत्न करत होते. त्यामुळे आता आम्ही अशी भरती करण्याचा निर्णय घेत आहोत, असे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. कॉंग्रेस- शरद पवार यांची राष्ट्रवादीच कंत्राटी पदभरतीची जननी आहे. त्यामुळे शिवसेना (उबाठा) -कॉंग्रेस-राष्ट्रवादीच्या (शरद पवार गट) विरोधात




गांधी चौक चंद्रपूर येथे भारतीय जनता पार्टी द्वारे तिव्र निदर्शने देण्यात आली.

दि. २१.ऑक्टोबर रोजी चंद्रपूर शहरातील गांधी चौक येथे भारतीय जनता पार्टी द्वारे कॉंग्रेस-राष्ट्रवादी पार्टीने राज्यामध्ये दीर्घ काळापासून कंत्राटी पध्दतीने विविध भागांमध्ये पदभरती केली. या विरोधात तिव्र निदर्शने देण्यात आली. यावेळी भाजपा महानगर चंद्रपूर अध्यक्ष राहूल पावडे म्हणाले, राज्यातील तरुणांच्या भविष्याचा विचार करून कंत्राटी पदभरती पध्दत राज्याचे उपमुख्यमंत्री .ना. देवेंद्र फडणवीस यांनी रद्द केला. भारतीय जनता पार्टीचा उद्देश सत्ता नसुन जनतेचे कल्याण आहे. युवकांची प्रगती आहे. त्यामुळे त्यांनी हा स्तुत्य निर्णय घेतला. यावेळी भारती जनता पार्टीचे राहुल पावडे, मंगेश गुलवाडे, ब्रिजभूषण पाझारे, राजू गोलीवार,रविंद्र गुरणुले,अजय सरकार,प्रदीप किरमे,अरुण तिखे, सविता कांबळे,शीला चव्हाण, माया उईके,पुष्पा उराडे,वनिता डुकरे,ज्योती गेडामदिनकर सोमलकर, विठल डुकरे,संदीप आगलावे,सचिन कोतपल्लीवार,रवी लोणकर,,प्रभा गुडधे,वंदना संतोषवरसिंधू राजगुरे,सुनीता जयस्वाल, मनीषा महातव,राजेंद्र खांडेकर, प्रज्वलन कडू, चांद सय्यद,सुनील डोंगरे, सत्यम गाणार, शकील शेख, जाहीर खान, प्रलय सरकार, मनोज पोतराजे,महेश झिटे,रवींद्र चहारे, राजू जोशी, हेमराज कळमकर, प्रवीण पोशेट्टीवर, प्रदीप मोगरे, गणेश रामगुंडावार, रमेश बीश्वास,निलेश बेडेकर, केतन मेहता, बाळू कोलनकर, विजय आगरे, चंदन पाल, पराग पिंपळकर, अमोल नगराळे, गोपाला जोशी, हर्षल येरावार, अनिकेत आगलावे, राजेश यादव, कुंदन सिंग, गुड्डू यादव, खुशाल साखरकर, सुभाश आदमाने, श्याम बोबडे, राहुल नकुलवार, रामकुमार अकापल्लीवार, भानेश मातंगी, विनोद शेरकी, , विनोद नवले, मधुकर राऊत, बबन राऊत, शुभम मंथनवार, प्रवीण ऊराडे, विष्णू वरभे ,पियुष भोगेकर आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# लोकमान्य कनिष्ठ महाविद्यालय,वरोराचा मुलींचा व्हॉलीबॉल संघ राज्यस्तरावर

**वरोरा । प्रतिनिधी**

वर्धा येथे झालेल्या नागपूर विभागीय स्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलींच्या गटात लोक शिक्षण संस्था, वरोडा अंतर्गत येणाऱ्या लोकमान्य कनिष्ठ महाविद्यालय ने चंद्रपूर जिल्हाचे प्रतिनिधित्व करताना नागपूर मनपा संघाचा २५-१० २५-१४ असा सरळ दोन डावात पराभव केला व नागपूर विभागीय स्पर्धेचे अजिंक्यपद कायम राखले. सोलापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय सदर स्पर्धेकरिता पात्र ठरला आहे.विजयी संघात प्रगती कायरकर, राधा कडू, फाल्गुनी कासावार, पूर्वा घानोडे, कस्तुरी नागेकर, अतिशा सपाटे, प्रणोती पेटकर, फाल्गुनी पवार व ऋतुजा वैरागडे यांचा समावेश होता. लोकशिक्षण संस्थेने गेली ५० वर्षांपासून व्हॉलीबॉल खेळात नेत्रदिपक कामगिरी करीत खेळातील वर्चस्व कायम



राखले आहे. लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत पाटील , उपाध्यक्ष श्रीकृष्ण घड्याळपाटील, कार्यवाह प्रा. विश्वनाथ जोशी, ड. दुष्यंत देशपांडे, सदस्य मंगेश मल्हार, मुख्याध्यापक राहुल राखे, उपमुख्याध्यापक दिपक नवले, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, वरोरा गटशिक्षणाधिकारी ज्ञानेश्वर चहारे, राज्य क्रीडा मार्गदर्शक भोजराज चौधरी, संदीप उईके, यांनी विजयी संघांचे अभिनंदन केले.सर्व खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय जेष्ठ मार्गदर्शक सुनील बांगडे, अनिल घुबडे, गणेश मुसळे,प्रशिक्षक निखिल बोबडे, प्रणाली मेश्राम, दुशांत लांडगे, प्रा. उत्तम देऊळकर, पालक तसेच लोकशिक्षण संस्था वरोडा यांना दिले आहे विजयी संघांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

# अजय कंकडालवार यांच्या हस्ते डान्स स्पर्धा कार्यक्रमाचे उदघाटन

**मूलचेरा । प्रतिनिधी**

नृत्यहीआनंदाची नैसर्गिक अभिव्यक्ती आहे.आनंद व्यक्त करणे, दिवसभराच्या श्रमानंतर संध्याकाळी एकत्र येऊन नृत्य गायनाने विरंगुळा आणि मनोरंजन करणे यातूनच लोकनृत्याचा जन्म झाला.नृत्यातून आपण आपली भावना व्यक्त करू शकतो.या नृत्याला पुढे काही नियम लागू झाले.ज्यांनी स्वतःभोवती शास्त्राचं वलय आणि तंत्राची चौकट निर्माण केलीत्यानृत्य शैलीला शास्त्रीय नृत्य शैली म्हणून मान्यता मिळाली.



मुलचेरा तालुक्यातील गोमणी येथे दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा मोठ्या उत्साहाने दुर्गा व शारदा उत्सव साजरा करण्यात येत असतो.काल मुलचेरा येथील सार्वजनिक शारदा मंडळ तर्फे डान्स कार्यक्रमाचे आयोजन केले होते.सदर डान्स कार्यक्रमाला आविसं अजय मित्र परिवारचे विदर्भ नेते माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांनी सार्वजनिक शारदा मंडळ गोमणी येते भेट देत देवीचे विधिवत पूजा अर्चना करून डान्स पोग्रॅम कार्यक्रमाचे उदघाटन केले.यावेळी यावेळी ग्रामपंचायत गोमनीचे उपसरपंच साईनाथ चौधरी,पोलीस पाटील गोमनी पि एम चौधरी,ग्रामपंचायत सदस्य शुभम शेंडे,लक्ष्मीकांत गरतुलवार, माजी सरपंच गोमनि शंकर वंगावार,माजी सरपंच देवाजी दिवाटीवार,सामजिक कार्यकर्ते अजय विरमालवार,नरेंद्र गर्गम,सामजिक कार्यकर्ते नारायण दिवटीवार,ग्रामपंचायत सदस्य गोविंदपुर,सरोजित हलदर,सेवानिवृत्ती शिक्षक येलमुलवार ,सामजिक कार्यकर्ते निलेश ओलालवार,राकेश सडमेक,प्रमोद गोडशेलवारसह सार्वजनिक शारदा मंडळाचे पदाधिकारी व सदस्यगण तसेच आविसं अजयभाऊ मित्र परिवाराचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# राजे अंब्रीशराव आत्राम यांच्या सहकार्याने सिरोंच्या तालुक्यातील मेडीगड्डा डॅम ते तेलंगणा या मार्गाची दुरुस्ती

## रस्त्याची रहदारी सुरळीत झाल्याने नागरिकांनी राजे अम्ब्रिशराव आत्राम यांचे मानले आभार

**सिरोंचा । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या तेलंगणा राज्याच्या सीमा लगत असलेला सिरोंचा तालुक्यातील असरअली, अंकिसा,वडदम, सोमनुर अशा अनेक गावातुन रोजंदारीसाठी हजारो मजूर मेडीगड्डा डॅम वरून रोज मजुरीसाठी वाहनांनी तेलंगणा राज्यात शेतीच्या कामाला दररोज रहदारी करत असतात.पण या वर्षी पावसामुळे मेडीगड्डा डॅम ते तेलंगणा जाणाऱ्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने रस्ता मोठ्या प्रमाणात खराब झाला होता आणि या खड्ड्यांमुळे रोजगारसाठी जाणाऱ्या मजदुरांना वाहनाने रहदारी करण्यासाठी खुप शारीरिक त्रास सहन करावा लागत होता आणि जीव धोक्यात घालून रहदारी करावी लागत होती.पण ही गावकऱ्यांची समस्या सिरोंच्या येथील भाजप कार्यकर्त्यांनी माजी राज्यमंत्री तथा माजी पालकमंत्री राजे अंब्रिशराव आत्राम यांच्या लक्षात आणून दिली. राजेंनी क्षणाचाही विलंब न करता कार्यकर्ते यांच्या हस्ते आर्थिक मदत पाठवून, गावकऱ्यांच्या माध्यमातून रस्ता दुरुस्ती करण्यात



आली,त्यामुळे मेडीगड्डा डॅम ते तेलंगणा हा मार्ग सुरळीत सुरू झाला.यामुळे असरअली, अंकिसा, वडदम,सोमनुर येथील गावकऱ्यांनी व वाहन धारकांनी पोस्टर लावून माजी पालकमंत्री राजे अंब्रीशराव आत्राम यांचे आभार मानले.माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांचे कार्यकर्ते शंकर नरहरी,सीतापती गट्टू,श्रीकांत सुगरवार,श्रीनाथ राऊत,मुरलीधर रच्चावार,समय्या सिंगनेनी,महेश कोत्तापल्ली,बट्टी मल्लेश, हरीश कोत्तावडला,अल्लम,सत्यम अशोक गंटा, असरअली, अंकिसा,वडदम,सोमनुर येथील गावकरी उपस्थित होते.

# मालेवाडा येथे खुले खंजेरी भजन स्पर्धेचे आयोजन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

२० ऑक्टोंबर ला मालेवाडा ता. कुरखेडा जि. गडचिरोली येथे नवयुवक दुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने आयोजित खुले खंजेरी भजन स्पर्धेचे उद्धाटन गडचिरोली जिल्हा कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांचे हस्ते, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी महासचिव डॉ. नामेव किरसान यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

यावेळी प्रमुख अतिथी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष मनोहर पाटील पोरेट्टी, तालुका कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष जीवन पाटील नाट, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर तुलावी, माजी सरपंच वासंती सयाम, सुधाकर भरणे, जीवन बांगरे, श्रावण दाणे, यशवंत मेश्राम, सुरेखा बनसकर, उमेश नंदनवार, वसंत घरते, सुभाष गुंडरे, राधेश्याम सिडाम तसेच साईबाबा नवयुवक दुर्गा उत्सव मंडळाचे पदाधिकारी, भजन मंडळ व गावकरी उपस्थित होते.राष्ट्रसंताचे भजन आणि विचार हे क्रांतिकारी होते, त्यांनी आपल्या भजनाच्या माध्यमातून अनेक तरुणांना स्वातंत्र्य लढ्यासाठी




प्रेरित केले, आज देशात परत हुकूमशाही प्रस्तापित होत असताना त्या हुकूमशाही ला उकडून फेकण्यासाठी व परत लोकशाही निर्माण करण्यासाठी राष्ट्रसंताच्या विचाराची गरज आहे असे प्रतिपादन गडचिरोली जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांनी यावेळी व्यक्त केले. भाजप सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे देशात प्रचंड महागाई वाढली असताना युवकांकडून भजन स्पर्धेचे आयोजन आणि त्यातून समाज प्रबोधन होणे हे अभिमानस्पद आहे असे मत डॉ. नामदेव किरसान यांनी व्यक्त केले.

# हिवरा ग्रामपंचायतीने राबविले आयुष्मान कार्ड शिबिर

## शिबिरात गावातील शेकडो लाभार्थ्यांनी काढले आयुष्मान कार्ड

**गोंडपीपरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील गोंडपीपरी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या हिवरा ग्रामपंचायतिने ५ लाखापर्यंत मोफत उपचार दिले जाणारे आरोग्याचे आयुष्मान कार्डचा लाभ गावातील सर्व नागरीकानी घेतला पाहिजे या दृष्टिकोनातून आज आयुष्मान कार्ड शिबिर राबविले. गावातील शेकडो नागरिकांनी या शिबिरात आयुष्मान कार्ड काढले.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि राज्य सरकारच्या महात्मा फुले आरोग्य योजनेचा अंतर्भाव करून आयुष्यमान भारत योजना राबविली जात आहे. आयुष्मान भारत कार्ड असलेल्या संपूर्ण भारतातील कुटूंबातील सर्व व्यक्तींचे हजारो प्रकारच्या बिमाऱ्यांवर पाच लाखापर्यंत मोफत शस्त्रक्रिया व उपचार होणार आहेत.मागिल अनेक दिवसापासून आयुष्मान कार्ड काढनेकरिता ग्रामपंचायत पदाधीकारी हिवरा गावातील नागरीकांना वारंवार माहिती देत होते, परंतू गावकरी याकडे लक्ष देत नसल्याची बाब ग्रामपंचायत



पदाधिकाऱ्यांच्या लक्षात आली.त्यामुळे थेट शिबिर राबविन्याचे नियोजन ठरले.आज या शिबिरात हिवरा गावातील २५० हून अधिक लाभार्थ्यांनी आयुष्मान कार्ड काढले.हिवरा ग्रामपंचायत स्थानिक गाव पातळीवर जनहिताचे विविध उपक्रम राबवित असताना दिसते.त्यात या शिबिराचे माध्यमातून गावातील आरोग्याच्या दृष्टिकोनातून आयुष्मान कार्डचा प्रत्येक नागरिकांना भविष्यात फायदा होईल.करिता गावातील एकही नागरीक वंचित न राहता सर्वांनी आयुष्मान कार्ड काढावे असे आव्हाहन या शिबिरात हिवरा ग्रामपंचायतीने केले.यावेळी सरपंच निलेश पुलगमकर, उपसरपंच वर्षा कुत्तरमारे, ग्रा.प.सदस्य जितेंद्र गोहणे, सदस्य देवानंद आक्केवार, सदस्या पुष्पा हिवरकर, सदस्या प्रतिमा आक्केवार, सदस्या अरुणा नेवारे, प्रा.आ.उपकेंद्राच्या अश्विनी चंद्रागडे, विशाखा झिलटे,सौ. मांढरे, आशासेविका भारती चहारे, ग्रा.प.कर्मचारी, शिपाई विद्या गुंडावार,चेतन पुलगमकर,ग्रा.प.आफरेटर उमेश पूलगमकर व गावातील विविध समित्यांचे पदाधिकारी उपस्थीत होते.

# आरेवाडी ता.कवठेमहांकाळ जि.सांगली येथे होणाऱ्या दसरा मेळाव्यात सांगोला तालुक्यातून हजारो

## धनगर समाज बांधव उपस्थित राहणार-अरविंद वलेकर विशेष समाज कल्याण परिषद राज्य उपाध्यक्ष

**सांगोला । प्रतिनिधी**

बहुजनांचे नेते आ. गोपीचंद पडळकर यांचे नेतृत्वाखाली आरेवाडी येथे होणाऱ्या दसरा मेळाव्यासाठी सांगोला तालुक्यातून हजारो धनगर समाज बांधव उपस्थित राहणार असल्याची माहिती आ. गोपीचंद पडळकर यांचे खंदे समर्थक आणि युवक नेते तअरविंद वलेकर यांनी दिली आहे.यावेळी बोलताना अरविंद म्हणाले की, राज्यात धनगर समाजाला एस.टी. आरक्षण मिळावे म्हणून ठिकठिकाणी आंदोलने होत आहेत आणि यासाठी समाज मोठ्या प्रमाणावर आक्रमक झाला आहे. धनगर समाजाच्या आरक्षणासाठी आग्रही असलेले आ. गोपीचंद पडळकर यांनी धनगर आरक्षणासाठीधनगर समाज आरक्षण जागर यात्रा काढली आणि या यात्रेला राज्यभरातून खूप मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. धनगर समाज आरक्षणाची हुंकार सरकारच्या



कानावर जाण्यासाठी आ. गोपीचंद पडळकर यांनी दिनांक२२/०८/२०२३आरेवाडी येथे बिरोबा बनात दसरा मेळाव्याचे आयोजन केले आहे. आणि या दसरा । मेळाव्यात धनगर समाज आरक्षणासाठी आग्रही असलेले राज्यभरातून लाखो धनगर समाज बांधव सहभागी होणार आहेत. या दसरा मेळाव्यात सांगोला,मंगळवेढा पंढरपूर तालुक्यातील अत्यंत जागरूक धनगर समाज मोठ्या प्रमाणावर आणि हजारोंच्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती ही यावेळी अरविंद वले कर यांनी बोलताना दिली आहे.

# शहीद पोलिसांचे बलिदान राष्ट्र कधीच विसरणार नाही–सीईओ विवेक जॉन्सन

# पोलिस स्मृति दिनानिमित्त शहीद पोलिसांना श्रद्धांजली






**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नागरिकांचे तसेच देशाचे रक्षण करताना वीरगती प्राप्त झालेल्या शहीद पोलिसांचे बलिदान राष्ट्र कधीच विसरणार नाही, असे मत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी व्यक्त केले.

पोलीस स्मृतिदिनानिमित्त जिल्हा पोलीस मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात शहीद पोलिसांना श्रद्धांजली अर्पण करताना ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक रिना जनबंधू, सहाय्यक पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपअधीक्षक (गृह) राधिका फडके, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर नंदनवार, रवींद्र जाधव, पोलीस निरीक्षक विजय राठोड, राजेश मुळे यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी व इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, कर्तव्यावर असताना आपल्या प्राणाची आहुती देणाऱ्या शहीद पोलिसांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी दरवर्षी २१ ऑक्टोबर रोजी पोलीस शहीद दिन पाळला जातो. लडाखच्या बर्फाच्छादित प्रदेशात २१ ऑक्टोबर १९५९ रोजी केंद्रीय राखीव पोलीस दलाचे (सीआरपीएफ) जवान सीमेवर गस्त घालत असताना चिनी सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला होता. या १० पोलीस शहीद झाले. तेव्हापासून राज्यात आणि देशात वर्षभरात शहीद झालेल्या पोलिसांना २१ ऑक्टोबर रोजी अभिवादन करण्यात येते, असे त्यांनी सांगितले.यावेळी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी पोलीस मुख्यालयात असलेल्या हुतात्मा स्मारकाला पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली. तसेच यावेळी पोलिसांनी बंदुकीच्या गोळ्या हवेत झाडत शहिदांना मानवंदना दिली. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या शहीद परिवारातील कुटुंबीयांसोबत मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी संवाद साधत त्यांची आस्थेने विचारपूस केली.

## आ.किशोर जोरगेवार यांनी वाहली क्रांतीवीर शहिद बाबूराव शेडमाके यांना आदरांजली

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



क्रांतीवीर बाबूराव शेडमाके यांच्या पूण्यतिथी निमित्त आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा कारागृह परिसरातील शहीद स्मारक येथे जात क्रांतीवीर शहिद बाबूराव शेडमाके यांना आंदराजली अर्पण केली. यावेळी कल्याणी किशोर जोरगेवार, यंग चांदा ब्रिगेडचे आदिवासी विभागाचे जिल्हाध्यक्ष जितेश कुळमेथे, वैशाली मेश्राम, नितेश गवळे, हनीफ शेख, शेखर मेश्राम, प्रवीण पंचबुधे, सूरज गावडे, गणेश ईसंनकर, संदीप जाधव, दीपक वांधारे, बाळू कुळमेथे,रणजित मडावी ,कमलेश आत्राम, सोमेश राजगडकर, सोनू चांदेकर, लता पोरटे आदींची उपस्थिती होती.आदिवासी समाजाच्या सन्मानासाठी क्रांतीवीर बाबूराव शेडमाके यांनी ब्रिटिशांविरोधात लढा उभारला पूढे हाच लढा चंद्रपूरच्या स्वातंत्रलढ्यात परिर्वतीत झाला. चंद्रपूर जिल्ह्याच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात अमर शहिद क्रांतिवीर बाबुराव शेडमाके यांचे बलिदान विशेष महत्वाचे असल्याची भावना यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केली. शहिद बाबूराव शेडमाके यांच्या पुण्यतिथी निमित्त जिल्हा कारागृहातील शहिद स्मारकास आमदार किशोर जोरगेवार यांनी भेट देत प्रतिमेला माल्यार्पण करत अभिवादन केले. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी क्रांतीवीर शहिद बाबूराव शेडमाके यांच्या नावाचा जयघोष केला.

## बेरोजगार युवांसाठी सर्वकष धोरण तयार करा: किशोर टोंगे यांची मागणी

**वरोरा । प्रतिनिधी**



राज्यशासनाने कंत्राटी भरतीचा जीआर रद्ध केल्याचे स्वागत आहे. पण या निर्णयानी तरुणांनी अधिक आनंदीत होण्याची आवश्यकता नाही. कारण शासनाने तरुणांची अप्रत्यक्षपणे चाचपणी घेतली आहे. या कंत्राटी भरतीमुळे तरुणांमध्ये असेलेली तीव्रता व दाहकता शासनाच्या लक्षात आली त्यामुळे हा निर्णय झाला आहे.

येत्या पूढील काळात पदभरतीचे अनेक प्रश्न ऐरणीवर येणार असून याबाबत शासनाकडे कुठलेही ठोस धोरण दिसून येत नाही. त्यामुळे खाजगी व सरकारी क्षेत्रातील निर्माण होणाऱ्या नोकऱ्या, लघु उद्योग, कौशल्य विकास आणि तरुणांसाठी उद्योगात प्रोत्साहन देणाऱ्या एकूण योजना आणि त्यातून होणारी मनुष्यबळ भरती यासह त्याच वेळापत्रक देणारं सर्वंकष धोरण तातडीने तयार करून त्याची अंमलबजावणी करावी अशी मागणी वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्राचे युवा उमेदवार किशोर टोंगे यांनी केली.राज्यात सुरु असलेली राजकीय अस्थिरता, सामाजिक गूतांगूतीचे प्रश्न, आरक्षणाचा पेच अशा विविध कारणामूळे या भरती प्रक्रीया निवडणुकीनंतर पुन्हा आपल्या समोर घेवुन हे सर्वपक्षीय लोक येतील. तसे आश्वासन देखील आपल्याला देतील त्यामुळे तरुणांनी सतर्क राहून दीर्घाकालीन धोरण आखण्यास व अंमलबजावणी करण्यास भाग पाडावे असे आवाहन त्यांनी केले.कंत्राटी भरती आणि बेरोजगारी याचे खापर सत्ताधारी विरोधक ऐकामेकांवर आता टाकतील, त्यामुळे या तकलादु धोरणाच्या विरोधात आपण कायमच राहीले पाहीजे आणि युवकांच्या भल्यासाठी एक कायमस्वरूपी धोरण तयार करण्यास सरकाला बाध्य केलं पाहिजे अशी भूमिका किशोर टोंगे यांनी मांडली.

## सी जी एच एस वेलनेस सेंटरच्या माध्यमातून रुग्णांच्या प्रभावी सेवेकरीता प्रयत्न करणार– हंसराज अहीर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**




चंद्रपूर शहरात केंद्रीय कर्मचारी व सेवानिवृत्तांकरीता वेलनेस सेंटरला मंजुरी मिळाली यासाठी माननिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व तत्कालीन तसेच विद्यमान केंद्रीय आरोग्य मंत्री स्तरावरुन सहकार्य लाभले मात्र या दरम्यान अनेक अडचणी उद्भवल्यानंतरही अखेरीस हे सी जी एच एसवेलनेस सेंटर रुग्णसेवेत रुजू होवून आज वर्षपूर्ती वर्धापन सोहळा साजरा होत आहे ही आनंदाची बाब असून या सेंटरच्या माध्यमातून रुग्णांना प्रभावी सेवा मिळण्याकरीता अडचणी दूर करुन विविध सेवा उपलब्ध करण्याकरीता प्रयत्न करण्याचे आश्वासन राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी दिले.

चंद्रपूरातील रेल्वेस्थानक परिसरात गतवर्षी ऑक्टोंबर २०२२ मध्ये प्रारंभ झालेल्या या वेलनेस सेंटर च्या प्रथम वर्धापन सोहळ्यानिमित्त दि. २१ ऑक्टोंबर रोजी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन हंसराज अहीर मार्गदर्शन करीत होते. या कार्यक्रमास सी जी एच एस च्या अतिरिक्त संचालक डॉ. विजया मोटघरे, चंद्रपूरच्या सी जी एच एस इनचार्ज डॉ. ममता आदेवार, जॉइंट सेक्रेटरी सुरेश डोरले, माजी न.प. उपाध्यक्ष अनिल फुलझेले, भाजपा जिल्हा महामंत्री रविंद्र गुरनूले, पेन्शनर असोसिएशनचे सचिव सुरेश धानोरकर आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.यावेळी बोलतांना हंसराज अहीर यांनी चंद्रपूरातील या सी जी एच एस वेलनेस सेंटर स्थापनेतील अडचणीबाबत माहिती देत बिल्डिंग व स्टाफ नियुक्ती पर्यंतच्या पाठपुराव्याबाबत केलेल्या प्रयत्नांची माहिती उपस्थितांना दिली. या वेलनेस सेंटरमधून उपचार करणाऱ्या केंद्रीय कर्मचारी व सेवानिवृत्त बांधवांना प्रभावी उपचार मिळण्याकरीता ज्या काही अडचणी उद्भवल्या आहेत. त्या सोडविण्याकरीता निश्चितपणे प्रयत्न करु असे आश्वस्त दिले. खाजगी डॉक्टर्सच्या सेवा उपलब्ध होण्यासाठी तसेच औषधांची कमतरता भासणार नाही याबाबतही आपण लक्ष घालू असे अहीर यांनी उपस्थितांना सांगितले.यावेळी डॉ. विजया मोटघरे यांनी सी जी एच एस वेलनेस सेंटर व्दारा केलेल्या मागण्यांबाबत वरीष्ठ स्तरावर पाठपुरावा करुन आरोग्य सेवेत उद्भवणाऱ्या अडचणी दुर करण्याचा प्रयत्न केला जाईल असे सांगितले. यावेळी डॉ. ममता आदेवार, सुरेश डोरले यांनीही वर्धापन प्रसंगी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पेन्शनर्स असोसिएशनचे सचिव सुरेश धानोरकर यांनी केले. या कार्यक्रमास सी जी एच एस चे अंशुमन जावडेकर, सिंह तसेच मनोहर साळवे शंकरराव गुडेल्लीवार, वासुदेवराव आसकर, रामानंद सिंह, सुनिल कोंकमवार, विजय खापने व अन्य मान्यवर उपस्थित होते.

## देवेंद्र बट्टे जिल्हा उपाध्यक्षपदी राजु झाडे गोंडपिपरी शहर अध्यक्षपदी नियुक्ती

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

गोंडपीपरी काँग्रेस शहर अध्यक्ष देवेंद्र बट्टे यांची पक्षाशी असलेली एकनिष्ठा




बघुन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार सुभाष धोटे यांनी देवेंद्र बट्टे यांची चंद्रपूर जिल्हा उपाध्यक्षपदी पदी नियुक्ती केली.सोबतच राजू झाडे यांना गोंडपिपरी काँग्रेस कमिटीच्या शहर अध्यक्ष पदाची जबाबदारी देऊन तसे नियुक्तीपत्र प्रदान केले.यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सोनिया गांधी यांचे हात बळकट करण्यासाठी व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे मार्गदर्शनात संघटन वाढवणे करीता उत्तम योगदान राहील अशी आशा व्यक्त केली.यावेळी तालुकाध्यक्ष तुकाराम झाडे,कार्याध्यक्ष निलेश संगमवार,अशोक रेचनकर,नगराध्यक्ष सविता कुळमेथे,तालुका उपाध्यक्ष नितेश मेश्राम,विनोद नागपुरे,गौतम झाडे,संभु येल्लेकर,बबलू कुलमेथे,नगरसेविका वनिता देवगडे,अनिल झाडे,रंजना रामगिरकार,संतोष चिंतावार,अजय माडुरवार, संतोष बंडावार उपस्थित होते.

# निरंजन बोबडे यांच्या १५१ कलावंताच्या गायन व नृत्यातून चंद्रपूरकरांना घडले ईश्वराच्या विविध रुपाचे दर्शन

## माता महाकाली महोत्सव, १५१ कलावतांचा भक्ती स्वराभिषेक कार्यक्रम संपन्न

**चंद्रपूर । प्रतिनिधी**




श्री माता महाकाली महोत्सवाच्या दुस–या दिवशी रात्री आठ वाजता सारेगामा फेम निरंजन बोबडे यांचा गायन व नृत्य कार्यक्रम भक्तीमय वातावरणात पार पडला. यावेळी त्यांच्या १५१ कलावतांनी सादर केलेल्या नृत्यातून चंद्रपूरकरांना ईश्वराच्या विविध रुपाचे दर्शन घडले.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी महाआरती आणि भजनाने महोत्सवला सुरवात झाली. त्यानंतर विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम पार पडलेत. तर तिस–या दिवशी दुपारी १० वाजता ग्रामगीता महिलोन्नती या विषयावर बाल किर्तनकार साक्षी अवतरे यांनी कीर्तन सादर केले. तर ११ वाजता प्रतिमा स्वरुप देवता या विषयावर स्तंभ लेखिका मुर्तीशास्त्र अभ्यासिका डॉ. रमा गोळवळकर यांचा व्याख्यान कार्यक्रम पार पडला. दुपारी १२. ३० वाजता विठ्ठल दिंडी तसेच चिंगारी हु मै या पथनाट्याचे सादरीकरण एकता बंडावार व त्यांच्या समुहाने सादर केले. दुपारी २ वाजता लोकजागृती नाट्य मंचाच्या वतीने गोंडवाना के महायोध्दा शहीद विर बाबूराव शेडमाके यांच्या जीवनावर नाटक प्रस्तुत करण्यात आले. यावेळी शहीद विर बाबुराव शेडमाके यांचा शुर इतिहास दर्शविण्यात आला.तर शुक्रवारी कार्यक्रमाच्या दुस–या दिवशी सारेगामा फेम निरंजन बोबडे यांच्या समुहाने महोत्सवात भक्तीची रंगत भरली. त्यांचा कार्यक्रम पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. सायंकाळी आठ वाजता त्यांच्या कार्यक्रमाला नृत्य सादरीकरणाने सुरवात झाली. त्यांच्या १५१ कलावतांच्या समुहाने विविध धार्मिक नृत्य सादर करत भक्तीमय वातावरण निर्माण केले. यावेळी निरंजन बोबडे व त्यांच्या समुहाचे श्री महाकाली माता समितीचे अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार आणि इतर पदाधिका–यांनी महाकाली मातेची मुर्ती भेट देत स्वागत केले. निरंजन बोबडे यांच्या कार्यक्रमामुळे महोत्सवात माता महाकालीच्या भक्तीचा जागर झाला असून त्यांनी सादर केलेल्या नृत्यातून ईश्वराच्या विविध रुपाचे दर्शन चंद्रपूकरांना घडले असल्याचे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. यावेळी मातेच्या भक्तांना पालखीचे दर्शन घेता यावे यासाठी मातेची पालखी कार्यक्रम पंडालात फिरविण्यात आली. हजारो नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. सुमेधा श्रीरामे, सरोज चांदेकर, एकता पित्तुलवार, अर्चना चौधरी, मृणालिनी खाडीलकर, जगदीश नंदुरकर आर्दीनी या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी उत्तमरित्या पार पाडली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .